क्रमांक : १५०३० / क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन,
मुबई, दिनांक : २९ ऑक्टोबर, २०२०

**संदर्भ :- वित्त विभाग शासन निर्णय क्र. वेतन-१११९/प्र.क्र.३/२०१९/सेवा ३, दिनांक २ मार्च, २०१९.**

**:: परिपत्रक ::**

या सचिवालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना कळविण्यात येते की, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या क्रमांक वेपूर – २०१९ /प्र.क्र.१/सेवा-९, दिनांक ३० जानेवारी, २०१९ रोजीच्या अधिसूचनेमध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २०१९ अन्वये या सचिवालयातील अधिकारी/कर्मचारी यांना सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनसंरचना अनुज्ञेय करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे वित्त विभागाचा शासन निर्णय क्रमांक-वेतन-१११९/प्र.क्र.३/सेवा-३, दिनांक १ जानेवारी, २०१९ नुसार पात्र अधिकारी/कर्मचारी यांना तीन लाभांची सुधारीत सेवांअर्गत आश्वासीत प्रगती योजना लागू करण्याचा राज्य वेतन सुधारणा समितीच्या शिफारशी स्विकृतीबाबत निर्णय घेण्यात आला आहे. तसेच वित्त विभाग शासन निर्णय क्र.वेतन-१११९/प्र.क्र.३/२०१९/सेवा ३, दिनांक २ मार्च, २०१९ नुसार सातव्या वेतन आयोगामध्ये १०,२० व ३० वर्षाच्या नियमित सेवेनंतरची, तीन लाभांच्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजना दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून अनुज्ञेय करण्यात आली आहे. उक्त योजना या सचिवालयातील अधिकारी/कर्मचारी यांना अनुज्ञेय करण्यात आली आहे.

या सचिवालयातील अधिकारी/कर्मचारी यांना १०/२०/३० वर्षांच्या नियमित सेवेनंतरची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचे लाभ अनुज्ञेय ठरविण्याची कार्यवाही सुरु असून, पात्र अधिकारी/कर्मचारी यांना उक्त नमूद शासन निर्णय मधील तरतुद क्र.IV मधील बाबींची पूर्तता करुन लाभ अनुज्ञेय ठरविण्यासंदर्भात विभागीय पदोन्नती समितींच्या दिनांक ३१ जानेवारी, २०२० रोजीच्या बैठकीत मान्यता देण्यात आलेली आहे.

वित्त विभागाच्या दिनांक २ मार्च, २०१९ रोजीच्या शासन निर्णयातील अ.क्र. (IV) मध्ये पुढील प्रमाणे तरतुद आहे.

"या तीन लाभाच्या योजनेच्या लाभार्थीस, पदोन्नतीच्या पदाकरीता विहीत केलेली अर्हता, ज्येष्ठता, पात्रता,अर्हता परीक्षा, विभागीय परीक्षा उत्तीर्ण असणे, गोपनीय अहवालाची प्रतवारी, विभागीय चौकशी व न्यायिक प्रकरण प्रलंबित नसणे (शासन निर्णय सा.प्र.वि.दि.१५.१२.२०१७ नुसार), यथास्थिती जातीवैधता प्रमाणपत्र उपलब्ध असणे, अशा पदोन्नतीच्या, कार्यपध्दतीची, विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीत पूर्तता करणे आवश्यक आहे".

सदरहू प्रकरणे या कार्यालयात १०,२० व ३० वर्षापूर्वी रुजू झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांची आहेत. त्यामुळे मुळ अभिलेखे तपासणे तसेच जातीवैधतेचे प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे या कार्यवाहीस काही कालावधी लागण्याची शक्यता आहे.

अत: सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेसंदर्भातील कार्यवाही तातडीने पूर्ण होण्यासाठी या सचिवालयातील अधिकारी/कर्मचारी यांनी ते धारण करीत असलेल्या जात प्रवर्गाचे जातीवैधता प्रमाणपत्र लवकरात लवकर उपलब्ध करुन दयावे जेणेकरुन सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजने संदर्भातील कार्यवाही तातडीने करणे सुलभ होईल.

आदेशानुसार,

(पूनम ढगे)
अवर सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**प्रति :-**

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे कार्यालय.
२) मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे कार्यालय.
३) मा.विरोधी पक्ष नेते, महाराष्ट्र विधानपरिषद व महाराष्ट्र विधानसभा यांचे कार्यालय.
४)सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.
५)महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी.
६) संगणक (क-२) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (संकेत स्थळावर अपलोड करण्याकरिता)
७)निवडनस्ती.